क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/११३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १० मे, २००५.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १९ एप्रिल, २००५ (मंगळवार) रोजी झालेल्या ११३ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

१०.५.२००५
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य.

निमंत्रित :-

१. प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

२. व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
प्रियदर्शिनी पार्कजवळ, देना बँकेसमोर,
नेपीयन्सी मार्ग, मुंबई - ४०० ०३६.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ११३ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक** : १९ एप्रिल, २००५ (मंगळवार)

**वेळ** : दुपारी १२.०० वाजता

**सभास्थान** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
समिती कक्ष, ६ वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.विलासराव देशमुख<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.राजेश टोपे<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.वसंत डावखरे<br>उपसभापती, विधानपरिषद | सदस्य |
| श्री.दत्ताराम दळवी<br>मुंबईचे महापौर,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.अरुण गणेश देव<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.खान मोहम्मद हाजी अब्बास बसतीवाला<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.मंगेश श्रीधर सातमकर<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.रा.मे.प्रेमकुमार<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.एन.रामाराव<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.अशोक सिन्हा<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

निमंत्रित :

श्री.ना.बा.पाटील
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.अनिलकुमार लखिना
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

बैठकीच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मुंबईचे महापौर श्री.दत्ताराम दळवी हे प्राधिकरणाचे पदसिध्द सदस्य म्हणून प्राधिकरणाच्या बैठकीस प्रथमच उपस्थित रहात असल्याने त्यांचे स्वागत केले. तसेच राज्याचे मुख्य सचिव श्री.रा.मे.प्रेमकुमार आणि सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक श्री.अशोक सिन्हा हे प्राधिकरणाचे पदाधिष्ठित सदस्य म्हणून प्राधिकरणाच्या बैठकीस प्रथमच उपस्थित रहात असल्याने त्यांचे अभिनंदन केले.

त्यानंतर, मा.अध्यक्ष यांनी मुंबईचे माजी महापौर श्री.महादेव देवळे आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष श्री.दत्ताराम दळवी यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

बैठकीपूर्वी, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री.श्रीधरन यांनी प्रस्तावित मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासंबंधी सादरीकरण केले.

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक १९ नोव्हेंबर, २००४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (११२ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.**

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक १९ नोव्हेंबर, २००४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (११२ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २००५-०६ चा वार्षिक कार्यक्रम**

३.१ सदर बाबीवर चर्चा झाल्यानंतर असे ठरविण्यात आले की, मिठी नदी व वाकोला नाला यामध्ये कायमस्वरुपी सुधारणा करण्यासाठी एक योजना तयार करुन प्राधिकरणास सादर करण्यात यावी तसेच वांद्रे-कुर्ला संकुलात कन्व्हेंशन सेंटर उभारण्यासंबंधात आवश्यक ती पुढील कार्यवाही प्राथम्याने हाती घेण्यात यावी.

३.२ त्यानंतर, प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या वार्षिक कार्यक्रमास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०४३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २००५-०६ चा वार्षिक कार्यक्रम व मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना-फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रम मंजूर करण्यात येत आहे. तसेच वार्षिक कार्यक्रमांत अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सन २००५-०६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक**

प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०४४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाचा अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा सन २००५-०६ चा अर्थसंकल्प आणि सन २००४-०५ चे सुधारीत अंदाजपत्रक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेला रु.१०५ लाख इतका भांडवली / विकास खर्चासाठी तसेच व्यवस्थापन व देखभालीपोटी करावयाच्या खर्चास आणि सन २००४-०५ या वर्षात अदा केलेल्या व अदा करावयाच्या एकूण रु.४० लाखाच्या अनुदानास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे. तसेच सदर खर्चास मान्यता देण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे योजना, सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम, अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु.५० लाखापेक्षा अधिक व्यय नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा अधिकार कार्यकारी समितीला प्रदान करीत आहे. तथापि, अशा प्रकरणाचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्यात यावा.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी आणि महानगर योजना - फिरता निधी यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे सन २००५-०६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००४-०५ चे सुधारीत अंदाजास मंजूरी देत आहे."

**बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "एफ" ब्लॉकमधील "स्टेडियम आणि मोकळी जागा" या आरक्षणामधून सुमारे १ हेक्टर क्षेत्राच्या भूखंडाचा जमीन वापर शासनाच्या निर्देशान्वये "संस्थात्मक प्रयोजनार्थ" असा फेरबदल करण्याबाबत.**

५.१ या प्रस्तावासंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील "एफ्" ब्लॉकच्या मंजूर आराखडयामधील "स्टेडियम आणि मोकळी जागा" या सुमारे ४.४६ हेक्टर क्षेत्राच्या आरक्षणामधून सुमारे १ हेक्टर क्षेत्राच्या भूखंडाचा जमीन वापर "संस्थात्मक प्रयोजनार्थ" असा बदलण्याची प्रक्रिया सुरु करण्यास दिनांक १९ नोव्हेंबर, २००४ रोजी झालेल्या ११२ व्या बैठकीत प्राधिकरणाने मान्यता दिलेली होती. त्याप्रमाणे प्राधिकरणाने राजपत्रात व वर्तमानपत्रामध्ये त्यासंबंधी नोटीस प्रसिध्द करुन विनिर्दिष्ट केलेल्या फेरबदलाबाबत हरकती व सूचना पाठविण्यासाठी एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. सदरहू कालावधीमध्ये एकही सूचना वा हरकत प्राप्त झालेली नाही. म्हणून वरील फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यास प्राधिकरणाची मान्यता घेण्यासाठी आता प्रस्ताव सादर केला आहे.

५.२ यावर चर्चा होऊन १ हेक्टरऐवजी १ एकर क्षेत्र फक्त संस्थात्मक प्रयोजनार्थ बदलावे असा प्रस्ताव शासनास पाठवावा असे ठरले.

५.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास वरील बदलासह मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१०४५ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "एफ्" ब्लॉकच्या मान्यताप्राप्त आराखडयामधील "स्टेडियम व मोकळी जागा" या सुमारे ४.४६ हेक्टर क्षेत्राच्या आरक्षणामधून सुमारे १ एकर क्षेत्राच्या भूखंडाचा जमीन वापर "संस्थात्मक प्रयोजनार्थ" असा बदलण्याचा प्रस्ताव, त्याबाबतचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) नुसार आवश्यक ते सोपस्कार पूर्ण झाल्यावर आता त्यास शासनाची पुढील योग्य ती मंजूरी मिळविण्यासाठी पाठविण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या संबंधात योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उत्तन-गोराई-मनोरी क्षेत्राचा मनोरंजन व पर्यटन विकास आराखडा बनविण्यासाठी, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

६.१ या प्रस्तावासंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उत्तन-गोराई-मनोरी क्षेत्राचा मनोरंजन व पर्यटन विकास क्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करावयाचे आहे. उक्त क्षेत्र भागशः बृहन्मुंबई व मिरा-भाईंदर या दोन महानगरपालिकांच्या अखत्यारीतील क्षेत्रात अंतर्भूत आहे. सदर क्षेत्र किनारा नियमन विभाग (CRZ) ने बाधित आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या क्षेत्राचा मनोरंजन व पर्यटन विकास आराखडा बनविण्यासंबंधी तात्कालीक कृती ठरविण्यासाठी एक संयुक्त समिती गठीत केली होती. या संयुक्त समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

६.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :—

ठराव क्र.१०४६ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२ च्या उपकलम (१) चे पोटकलम (क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे उत्तन-गोराई-मनोरी या क्षेत्राचा मनोरंजन व पर्यटन विकास आराखडा बनविण्यासाठी खालील बाबींना मान्यता देत आहे :—

(अ) उत्तन-गोराई-मनोरी या क्षेत्रासाठी मनोरंजन व पर्यटन विकास आराखडा बनविण्याचा उद्देश जाहीर करणे, अस्तित्वातील जमीन वापराचे सर्वेक्षण करणे व विकास आराखडा बनविणे या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या अंतर्गत करावयाच्या कृतींची सुरुवात करणे.

(य) उक्त क्षेत्रासाठी मनोरंजन व पर्यटन विकास आराखडा बनविण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करणे.

(क) उक्त क्षेत्राचा आराखडा व विकास नियंत्रण विनियम मंजूर होईपर्यंत उक्त क्षेत्रातील विकासाचे नियंत्रण प्राधिकरण वांद्रे-कुर्ला संकुलातील प्राधिकरणाची मालकी नसलेल्या क्षेत्रात विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून करीत असलेल्या कार्यपध्दतीच्या धर्तीवर करणे आणि नंतर त्यांचा आढावा घेणे.

(ड) उक्त क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावरील नियंत्रणासंबंधी बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांना लागू असलेल्या महानगरपालिका कायद्यानुसार कार्यवाही चालू ठेवावी.

(ई) उक्त क्षेत्रात मंजूर विकास आराखडयानुसार पायाभूत सुविधा पुरविण्याचे काम सदर दोन महानगरपालिकांनी त्यांच्या क्षेत्रात चालू ठेवावे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या रिकाम्या जमिनी तात्पुरत्या वापरासाठी देण्याच्या दरामध्ये सुधारणा करणेबाबत.

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या रिकाम्या जमिनी तात्पुरत्या वापरासाठी मिळणेबाबत विविध संस्थांकडून मागणी येत असल्यामुळे दिनांक ४ एप्रिल, १९९६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ८२ व्या बैठकीतील ठराव क्रमांक ६६४ अन्वये व दिनांक २७ नोव्हेंबर, १९९७ रोजी झालेल्या ९० व्या बैठकीतील ठराव क्रमांक ७३८ अन्वये धोरण ठरविण्यात आले होते. सदर धोरणास बराच कालावधी झाल्यामुळे तसेच प्राधिकरणाच्या वडाळा ट्रक टर्मिनल येथील जमिनीच्या भूईभाडयात शासनाने वाढ केल्यामुळे दिनांक १ सप्टेंबर, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १०७ व्या बैठकीतील ठराव क्रमांक ९८७ अन्वये तात्पुरत्या जमीन वापरासाठी दर पध्दती ठरविण्यात आली होती. परंतु या धोरणात्मक निर्णयास १ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यामुळे तसेच प्राधिकरणामार्फत पुरविण्यात येत असलेल्या संरक्षण, स्वच्छता, देखभाल व इतर पायाभूत सुविधा खर्चात वाढ झाल्यामुळे प्राधिकरणाच्या रिकाम्या जमिनी तात्पुरत्या वापरासाठी देण्याच्या धोरणात बदल करुन, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सुधारीत दर प्रस्तावित करण्यात आले आहेत.

७.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०४७</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे खालील तक्त्यात दिलेल्या प्रयोजनासाठी व त्यासमोर दाखविलेल्या भाडयाच्या दराने प्राधिकरणाच्या मोकळया जमीनी तात्पुरत्या वापरासाठी देण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र. | तात्पुरत्या वापराचे वाटपग्राही व प्रयोजन | प्राधिकरणाने आकारणी करावयाचा सुधारीत दर रु. प्रति दिन प्रति चौरस मीटर |
|---|---|---|
| १. | <u>प्राधिकरणाचे ठेकेदार यांना</u> - तात्पुरत्या वापरासाठी साईट ऑफीस / गोडाऊन बांधण्यासाठी व प्राधिकरणाच्या कामासाठी रेडिमिक्स कॉंक्रीट प्लँट किंवा कास्टींग यार्ड उभारण्यासाठी | रु.१.२५ |
| २. | <u>भुखंडधारकाचे ठेकेदार यांना</u> - साईट आफीस / गोडाऊन बांधण्यासाठी | रु.४.०० |
| ३. | <u>शासकीय / निमशासकीय संस्थांना</u> - त्यांच्या ठेकेदारांना साईट ऑफीस बांधण्यासाठी व रेडिमिक्स कॉंक्रीट प्लँट व कास्टींग यार्ड उभारण्यासाठी | रु.१.५० |
| ४. | <u>खाजगी ठेकेदारांना</u> - प्राधिकरणाच्या कामाव्यतिरिक्त अन्य कामासाठी कास्टींग यार्ड व रेडिमिक्स कॉंक्रिट प्लँट / साईट ऑफीस / गोडाऊन इत्यादींसाठी | रु.४.०० |
| ५. | <u>शासकीय / निमशासकीय / स्वयंसेवी संस्थांना</u> - त्यांच्या आरोग्य व शैक्षणिक जागृतीविषयक कामासाठी | रु.१.०० |
| ६. | <u>शासकीय / निमशासकीय / स्वयंसेवी संस्थांना</u> (उदा. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ) सार्वजनिक कामासाठी | रु.१.०० |

वरील दर हे सन २००५ या वर्षातील वाटपाकरीता व यापुढील वर्षातील वाटपाकरीता १०% इतकी वाढ करुन लागू राहतील.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणामार्फत हाती घेतलेल्या मुलभूत सोयीसुविधांच्या कामावर किंवा प्राधिकरणाच्या मालमत्तेवर परिणाम होणार नाही याची काळजी घेऊन नव्याने वाटप करावयाच्या किंवा मुदतवाढीसाठी मागणी आलेल्या जागेस, सुधारीत दरास मान्यता मिळेल त्या तारखेपासून, सुधारीत दराने आकारणी करण्यास तसेच एकूण भाडयाच्या ३०% अथवा कमीत कमी रु.१०,०००/- इतकी अनामत रक्कम आगाऊ घेण्यास व ती बिनव्याजी परत करण्यास, अटी व शर्ती ठरवून एकावेळी जास्तीत जास्त ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या वापरासाठी जागा देण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या ठराव क्र.९८७ अन्वये दर निश्चित करुन या अगोदर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या वापरासाठी ज्या दराने जागा वाटप केली आहे त्यांना मंजूर कालावधीसाठी जुन्या धोरणाप्रमाणे भाडे ठेवण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : बॅकबे रेक्लेमेशनच्या मंजूर विकास आराखडयातील भूखंड क्र.२४३ अ "पार्किंग व गार्डन" या आरक्षणामधील काही भाग "सीएनजी आऊटलेट" असा फेरबदल करण्याबाबत शासनाचा आदेश.**

८.१ या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बॅकबे रेक्लेमेशन क्षेत्राच्या मंजूर आराखडयामधील भूखंड क्रमांक २४३-अ वरील "पार्किंग व गार्डन" अशा आरक्षणामधून महानगर गॅस लिमिटेडला सीएनजी आऊटलेटसाठी द्यावयाच्या ३०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाचे आरक्षणात "सीएनजी आऊटलेट" असा बदल करण्याच्या प्रस्तावास दिनांक १९ नोव्हेंबर, २००४ रोजी झालेल्या ११२ व्या बैठकीत प्राधिकरणाने मान्यता दिलेली होती. त्याप्रमाणे प्राधिकरणाने राजपत्रात तसेच दोन वर्तमानपत्रांमध्ये त्यासंबंधी नोटीस प्रसिध्द करुन विनिर्दिष्ट केलेल्या फेरबदलाबाबत हरकती व सूचना पाठविण्यासाठी एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. सदरहू कालावधीमध्ये एकही सूचना वा हरकत प्राप्त झालेली नाही. वरील फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यास प्राधिकरणाची मान्यता घेण्यासाठी आता प्रस्ताव सादर केला आहे.

८.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०४८</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे बॅकबे रेक्लेमेशन क्षेत्राच्या मंजूर विकास आराखडयातील क्रमांक २४३-अ या भूखंडाच्या "पार्किंग व गार्डन" अशा आरक्षणामधून महानगर गॅस लिमिटेडला सीएनजी आऊटलेटसाठी द्यावयाच्या ३०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाचे आरक्षण "सीएनजी आऊटलेट" असा बदल करण्याचा प्रस्ताव, त्याबाबतचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) नुसार आवश्यक ते सोपस्कार पूर्ण झाल्यावर आता त्यास शासनाची पुढील योग्य ती मंजूरी मिळविण्यासाठी पाठविण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबंधात योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.९</u> : <u>प्रदर्शने, व्यापारी जत्रा, संगीत व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची मैदाने तात्पुरत्या भाडयाने देण्याबाबतचे धोरण.</u>**
**<u>- सन २००५ साठी प्रस्तावित दर.</u>**

या प्रस्तावासंबंधी सखोल अभ्यास करावा लागेल असे सदस्यांनी सांगितल्यामुळे या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**<u>बाब क्र.१०</u> : <u>वांद्रे-कुर्ला संकुलात मुंबई फेस्टीव्हल २००५ भरविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची जागा तात्पुरत्या भाडयाने देण्याबाबत.</u>**

१०.१ या बाब टिप्पणी संबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, Tourism Co-operative यांच्यातर्फे आयोजित मुंबई फेस्टीव्हल हा कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने पुरस्कृत केलेला होता. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून वांद्रे-कुर्ला संकुलात दिनांक १२ ते १७ जानेवारी, २००५ या कलावधीत युथ म्युझिक फेस्टीव्हल हा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमात

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलाकार सहभागी झाले होते तसेच हा कार्यक्रम विनामूल्य व सर्व जनतेसाठी खुला होता. म्हणून या कार्यक्रमासाठी आकारावयाच्या एकूण भाडयाच्या ५०% म्हणजे रुपये १,१२,३१३/- एवढी सूट "विशेष बाब" म्हणून दिली. तसेच विशेष बाब म्हणून या कार्यक्रमासाठी सुरक्षा अनामत रक्कम रुपये १,१२,३१३/- न भरण्याची सूटही दिली. यासाठी कार्योत्तर मंजूरी देण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

१०.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०४९</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे Tourism Co-operative या संस्थेस त्यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या मुंबई फेस्टीव्हल २००५ या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून वांद्रे-कुर्ला संकुलात आयोजित केलेल्या युथ म्युझिक फेस्टीव्हल या कार्यक्रमासाठी दिलेल्या भूखंडाच्या वापरासाठी फक्त या वर्षाकरीता "विशेष बाब" म्हणून भूखंड वापराच्या भाडयामध्ये दिलेली ५०% इतकी सूट तसेच सुरक्षा अनामत रक्कम न भरण्याची दिलेली सूट यास कार्योत्तर मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.११</u> : <u>वांद्रे-कुर्ला संकुलातील एक मोकळा भूखंड चित्रपट व दूरदर्शन निर्मात्यांकडून त्सुनामीग्रस्तांसाठी मदत निधी गोळा करण्यासाठी भाडे न आकारता वापरण्याबद्दल.</u>**

११.१ या बाब टिप्पणीसंबंधी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर कार्यक्रमाद्वारे त्सुनामीग्रस्तांसाठी मदत निधी गोळा करुन जमविलेला निधी पंतप्रधान सहाय्य निधीत जमा करावयाचा असल्यामुळे त्यासाठी प्राधिकरणाची जागा वापरण्याच्या भाडयामध्ये १००% इतकी सूट देण्यात आली. यासंबंधात मा.अध्यक्ष यांनी विचारणा केली असता, सदर कार्यक्रमाद्वारे जमविलेल्या निधीतून पंतप्रधान सहाय्य निधीला किती रक्कम देण्यात आली याची माहिती पुढील बैठकीत सादर

करण्यात येईल असे महानगर आयुक्तांनी सांगितले. तसेच यापुढे मुख्यमंत्री निधीस मदत करण्यासाठी कार्यक्रम प्रस्तावित केल्यास त्यासाठीही भाडयामध्ये सवलत देण्याचा विचार करण्यात यावा अशी सदस्यांनी सूचना केली. या सूचनेस मा.अध्यक्षांनी मान्यता दिली.

११.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१०५० :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे The Film & Television Producers Guild of India या संस्थेस, त्यांच्यातर्फे त्सुनामीग्रस्तांसाठी मदत निधी गोळा करण्यासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात आयोजित केलेल्या 'Help Telethon' हया कार्यक्रमासाठी १९५०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड दिनांक २० जानेवारी ते दिनांक १० फेब्रुवारी, २००५ या कालावधीतील एकूण २२ दिवस वापरासाठी आकारावयाच्या भाडयामध्ये दिलेली १००% इतकी सूट तसेच सुरक्षा अनामत रक्कम न भरण्याची दिलेली सूट (भाडे न आकारण्यामुळे सेवाकर आकारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही) यास कार्योत्तर मान्यता देत आहे."

बाब क्र.१२ : मुंबई महानगर प्रदेशातील बाहय रस्त्यांची सुधारणा - उपप्रकल्प - ५ (ब) च्या वाढीव रकमेस मान्यता मिळणेबाबत.

१२.१ या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा संतुलित विकास करण्यासाठी तसेच आंतरप्रादेशिक असमतोल दूर करुन वाहतूकीच्या मुलभूत सोयींमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेशाच्या महापालिका क्षेत्राबाहेरील रस्त्यांची सुधारणा करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी संबंधीत संस्थांना प्राधिकरणाकडून अनुदान देण्यात येते. या प्रकल्पांतर्गत ठाणे जिल्हा परिषदेने उप-प्रकल्प - ५ (ब) मध्ये प्रस्तावित केलेल्या ६६ रस्त्यांच्या विकास कामांच्या रु.५.५७ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्राधिकरणाने मान्यता दिली होती. प्रस्तावित कामांचे अद्ययावत नकाशे आणि

सविस्तर अंदाजपत्रके तयार केल्यानंतर तसेच सुधारीत दरांनुसार प्रस्तावित ६६ रस्त्यांच्या विकास कामांपैकी ५७ रस्त्यांच्या कामांचा अंदाजित खर्च सुमारे रु.७.५१ कोटी इतका झाला आहे. या सुधारीत अंदाजित खर्चास प्राधिकरणाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. दिनांक १४ फेब्रुवारी, २००० रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीत या प्रकल्पासाठी प्राधिकरणाकडून द्यावयाच्या अनुदानाच्या रक्कमेत ७५% वरुन ९०% इतकी वाढ करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.

१२.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१०५१ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेशातील (महापालिका क्षेत्राबाहेरील) बाहय रस्ते सुधारणा करण्याविषयीच्या उप-प्रकल्प-५(ब) मध्ये प्रस्तावित केलेल्या ठाणे जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील ५७ रस्त्यांच्या कामांच्या सुमारे रु.७.५१ कोटी इतक्या सुधारीत अंदाजित खर्चास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबंधात आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास आणि सर्वसाधारण मान्यता देण्यास तसेच वेळोवेळी अनुदान वितरीत करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## बाब क्र.१३ : महाराष्ट्रात नागरी व्यवस्थापन संघटना CITY MANAGERS ASSOCIATION OF MAHARASHTRA (C.M.A.M.) स्थापण्याबाबत.

१३.१ या बाब टिप्पणी संबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे उद्‌भवलेल्या नागरी विभागाच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याविषयीच्या वाढत्या मागणीबाबत विचार करुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र नागरी व्यवस्थापन

संघटना स्थापन केली आहे. विविध स्थानिक स्वराज्य संस्थांचे अनुभव व माहिती यांची देवाण-घेवाण अशा व्यासपीठावर करता येईल. संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये सदर संघटनेची नोंद करण्यात आली आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, संघटना स्थापन करुन कार्यवाही सुरु करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे तसेच मुं.म.प्र.वि.प्राधिकरण व इतर संस्थांनी सदर समितीचे सदस्यत्व स्विकारण्याबाबत विचार करावा व संघटना निधी (Corpus Fund) संकलनाचा आपला वाटा द्यावा असेही या संबंधीत शासन निर्णयात नमूद केले आहे. शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी व्यवस्थापन संघटनेच्या कार्यासाठी मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने रु.१०,००,०००/- निधी संकलनासाठी (Corpus Fund) व रु.१,००,०००/- सध्याच्या वार्षिक वर्गणीसाठी प्रदान करावेत असे प्रस्तावित आहे. यानुसार प्राधिकरणाने संघटना निधीचा आंशिक हिस्सा म्हणून रु.१,००,०००/- व वार्षिक वर्गणी म्हणून रु.१,००,०००/- महाराष्ट्र नागरी व्यवस्थापन संघटनेस अदा केले आहेत. उरलेली रक्कम इतर सदस्यांनी निधी संकलनाला दिलेला प्रतिसाद बघून द्यावयाची आहे. महाराष्ट्र नागरी व्यवस्थापन संघटनेस व उपरोल्लेखित रु.२,००,०००/- च्या केलेल्या प्रदानास कार्योत्तर मंजूरीसाठी आता प्रस्ताव सादर केला आहे. तसेच निधी संकलनासाठी आणि वार्षिक वर्गणीसाठी यापुढे वेळोवेळी करावयाच्या प्रदानासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे असेही प्रस्तावित करण्यात येत आहे.

१३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१०५२ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२(एल), ४६-अ(२) आणि १६ (क) (दोन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे महाराष्ट्र नागरी व्यवस्थापन संघटनेच्या निधी संकलनातील (कॉर्पस फंड) आंशिक हिस्सा म्हणून रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) तसेच सदर संघटनेची सध्याची वार्षिक वर्गणी म्हणून रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) प्रदान करण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र नागरी व्यवस्थापन संघटनेच्या निधी संकलनातील उर्वरीत हिस्सा म्हणून रु.९,००,०००/- (रुपये नऊ लाख मात्र) तसेच सदर संघटनेची यापुढे वेळोवेळी निश्चित करण्यात येणारी वार्षिक वर्गणी प्रदान करण्यास तसेच या प्रकरणी आवश्यक असलेली पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : मुंमप्र-वास्तुवारसा संरक्षण संस्था आणि मुंमप्र-पर्यावरण सुधारणा संस्था मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिलेले बिनव्याजी कर्ज प्रत्येकी रु.५ कोटी मूळ निधी म्हणून मंजूर करण्याबाबत.**

या प्रस्तावासंबंधात असे ठरविण्यात आले की, मुंमप्र-वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुंमप्र-पर्यावरण सुधारणा संस्था यांनी मागील ५ वर्षात केलेल्या कार्याचा अहवाल तयार करुन त्यासंबंधात सादरीकरण करावे व त्यानंतर सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर करण्यात यावा.

**बाब क्र.१५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मध्ये सुधारणा करणेबाबत.**

१५.१ या प्रस्तावासंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, शासकीय कर्मचा-यांना लागू असलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या धर्तीवर, प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ तयार केले आहेत. प्राधिकरणाने घरबांधणी अग्रीमासंबंधी स्वतंत्र विनियम केल्यामुळे, जेव्हा संबंधित शासकीय नियम सुधारीत केले जातात तेव्हा या सुधारणानुसार मुं.म.प्र.वि.प्राधिकरण कर्मचारी (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मध्ये सुधारणा करण्यात येतात. शासनाने असा निर्णय घेतला आहे की, शासकीय कर्मचा-यास सेवेमध्ये असताना अकाली मृत्यू आल्यास अशा शासकीय कर्मचा-यास महाराष्ट्र शासकीय कर्मचारी घरबांधणी अग्रीम नियम, १९६२ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीमावरील व्याजाची वसूली संबंधित प्रशासकीय विभागाने सोडून द्यावी. तसेच शासकीय कर्मचा-याच्या मृत्यूच्या दिवशी (तारखेस) त्याच्या नावे असलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या मुद्दलाची वसूली नियमानुसार अशा शासकीय कर्मचा-यास देय असलेल्या उपदानातून भागविण्यात यावी. अशाप्रकारे मेळ घातल्यानंतर सुध्दा काही बाकी शिल्लक

असेल तर संबंधित प्रशासकीय विभागाने २५००० रुपयांपर्यंतची रक्कम सोडून द्यावी. हे आदेश दिनांक १ जानेवारी, १९८१ पासून अंमलात आलेले आहेत. परंतु मुं.म.प्र.वि.प्राधिकरण कर्मचारी (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मध्ये प्राधिकरणातील कर्मचारी सेवेत असताना मृत्यू पावल्यास त्याच्या नावे मंजूर झालेल्या घरबांधणी अग्रीमाच्या रकमेवरील व्याज सोडून देणेबाबत कोणतीही तरतूद नाही. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या शासन निर्णयानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

१५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१०५३ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५० व कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मध्ये सोबतच्या जोडपत्राप्रमाणे (जोडपत्र) सुधारणा करण्यास मान्यता देत आहे."

मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले इतर विषय :

श्री.वसंत डावखरे, प्राधिकरणाचे सदस्य यांनी असे सांगितले की, प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांच्या गृहनिर्माण संस्थेस चितळसर-मानपाडा, ठाणे येथील जमीन देण्यास प्राधिकरणाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधिकरणाने हाती घेतलेल्या कामांसंबंधी श्री.दत्ताराम दळवी, मुंबईचे महापौर व प्राधिकरणाचे सदस्य यांनी अशी सूचना केली की, पावसाळा

जवळ आला असल्याने ही कामे लवकर पूर्ण करण्यात यावीत. या संबंधात, अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, या कामांमुळे पावसाळयामध्ये कोणतीही समस्या निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. त्यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे सुमारे ३५,००० कुटूंबांचे (निवासी आणि वाणिज्यिक) पुनर्वसन करावे लागणार आहे. शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार दिनांक १ जानेवारी, १९९५ पूर्वीचे झोपडपट्टीधारक / प्रकल्पबाधित पुनर्वसनास पात्र ठरतात. सन १९९५-२००० या कालावधीतील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाबाबतील धोरण ठरविण्याची प्रक्रिया शासनस्तरावर सुरु झाली असून शासनस्तरावर असे आदेश देण्यात आले आहेत की, सन १९९५-२००० या कालावधीतील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाचे धोरण निश्चित होईपर्यंत अशा झोपडपट्टया तोडू नयेत. त्यामुळे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील रस्त्यांचे रुंदीकरण करता येत नाही व प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये विलंब होत आहे. पावसाळयापूर्वी अशा झोपडपट्टया न हलविल्यास पावसाळी गटारांचे बांधकाम करता येणार नाही. त्यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणाने प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी सदनिकांचे बांधकाम पूर्ण केले असले तरीही शासनाचा धोरणात्मक निर्णय न झाल्यामुळे झोपडपट्टयांच्या पुनर्वसनासंबंधात पुढील कार्यवाही करता येत नाही व त्यामुळे प्रकल्पाच्या कामास गती येत नाही. म्हणून सन १९९५-२००० या कालावधीतील झोपडपट्टीधारकांच्या बाबतीत शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय तातडीने होणे आवश्यक आहे. यासंबंधात मुख्य सचिवांनी अशी सूचना केली की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या पुनर्वसनाच्या धोरणानुसार मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे बाधित होणा-या लोकांचे पुनर्वसन करण्यासंबंधी विचार करावा, तसेच शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय होईपर्यंत दिनांक १ जानेवारी, १९९५ पूर्वीच्या झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन कायमस्वरुपी सदनिकांमध्ये करावे व सन १९९५-२००० या कालावधीतील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन प्राधिकरणाच्या संक्रमण शिबिरात करावे. या सूचनेस मा.अध्यक्षांनी सहमती दर्शविली. त्यानंतर, मा.अध्यक्षांनी असे निदेश दिले की, सन १९९५-२००० या कालावधीतील झोपडपट्टयांसंबंधी शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय लवकर घेऊन त्यासंबंधी गृहनिर्माण विभागाने प्राधिकरणास तातडीने सूचना द्याव्यात.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

************

जोडपत्र

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी (गृहनिर्माण कर्जे) (सुधारणा) विनियम, २००५

(१) या विनियमास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी (गृहनिर्माण कर्जे)(सुधारणा) विनियम, २००५ असे संबोधण्यात यावे.

(२) ही सुधारणा वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.एचबीए-१०७६/सीआर-७६५/जीइएन-५, दिनांक ५ फेब्रुवारी,१९८१ नुसार दिनांक ५-२-१९८१ पासून कार्यान्वित झाल्याचे मानण्यात यावे.

(३) मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मधील विनियम १३ - कर्जाची परतफेड मधील नियम (फ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे --

१३. (फ) एखादा कर्मचारी सेवानिवृत्तीचे वय झाले आहे किंवा मृत्यु पावला या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणाने सेवेत राहीला नाही तर कर्जाची तोपर्यंत देय असलेली सर्व रक्कम अधिक त्यावर झालेले व्याज अशी एकूण रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे ताबडतोब भरणे प्राप्त होईल. कोणत्याही कर्मचा-याने कोणत्याही कारणास्तव कर्ज किंवा त्यावरील व्याज याची परतफेड करण्यात कसूर केल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कर्जाची परतफेड न झालेली बाकी रक्कम अथवा त्यावरील व्याज वसूल करण्यासाठी कोणतेही गहाण खत केले असल्यास त्याच्या तारणाची अंमलबजावणी करण्यासाठी अथवा महसूलाची थकबाकी वसूल करण्यासाठी येणारी कार्यवाही सुरु करण्यास किंवा इतर कोणत्याही विधी-संमत मार्गाचा अवलंब करण्यास अधिकार प्राप्त होईल.

तसेच मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (गृहनिर्माण कर्जे) विनियम,१९८१ मधील नियम १३(फ) नंतर खालीलप्रमाणे १३ (ग) चा अंतर्भाव करण्यात येत आहे.

१३ (ग) महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.एचबीए-१०७६/सीआर-७६५/जीइएन-५ दिनांक ५ फेब्रुवारी, १९८१ नुसार प्राधिकरणाच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याचा अकाली मृत्यू झाल्यास प्राधिकरणातील अशा कर्मचा-यास मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीमावरील व्याजाची वसूली सोडून द्यावी. प्राधिकरणातील कर्मचा-याच्या मृत्यूच्या दिवशी त्यांच्या नावे असलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या मुद्दलाची वसुली नियमानुसार देय असलेल्या उपदानातून भागविण्यात यावी. अशाप्रकारे मेळ घातल्यानंतर सुध्दा काही भाग शिल्लक असेल तर रु.२५०००/- पर्यंत रक्कम सोडून द्यावी.

........